शिल्पकार विकासाचा...

देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com

26 Jan 2026 - Page 4 CITY

# स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२५ मध्ये के. के. वाघ महाविद्यालय अव्वल

**■ नाशिक | प्रतिनिधी**

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय, ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन, भारत सरकारचा इनोव्हेशन सेल तसेच एसबीआय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२५ या देशातील प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प स्पर्धेत नाशिकच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सॉफ्टवेअर प्रकारात देशात प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश मिळवले आहे.




ही स्पर्धा नुकतीच देशभरातील विविध नोडल सेंटर्समध्ये पार पडली. प्राथमिक फेरीत पात्र ठरलेल्या संघांना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे तब्बल ११ संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरले, त्यापैकी सॉफ्टवेअर विभागात सहा संघांनी प्रथम क्रमांक पटकावला.

आंध्र प्रदेशातील गुंटूर येथे झालेल्या अंतिम फेरीत 'सृज्यम्या' या मुलींच्या संघाने इंडियन नॉलेज सिस्टीम या प्रकल्पासाठी प्रथम क्रमांक मिळवून १.५० लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले. या संघात हर्षिता गांधी, गायत्री दुसे, ऋतुजा गायकवाड, पियुषा पाटील, साक्षी मालपुरे आणि तन्वी कोठावडे यांचा समावेश होता.त्याचप्रमाणे बंगळुरू येथे 'ट्विन एस' संघातील आकांक्षा सुत्रावे, अनुराग मोहोद, अभिषेक अहिराव, चंचल महालपुरे, सागर साहू व वैष्णवी पवार यांनी मॅथवर्क इंडिया यांच्या प्रॉब्लेम स्टेटमेंटवर प्रभावी सादरीकरण करत १.५० लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळवले.

विधी मेटकर, तेजल पाटील, यश गिरी, यश बर्वे, भूषण गवळी व आयुष पुंड यांच्या 'केबलसेन्स' संघानेही प्रथम क्रमांक पटकावत १.५० लाख रुपयांचे बक्षीस मिळवले.याशिवाय कोल्हापूर येथील के. आय. टी. अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या स्पर्धेत पार्थ पवार, अथर्व वाघ, दर्शन जगताप, शंशाक विसपुते, खुशी विसपुते व अवंती पाटील यांच्या 'अग्रतास' संघाने प्रथम क्रमांक मिळवून ७५ हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त केले.ङ्गङ्ग्या यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी, प्राचार्य, प्राध्यापक व मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून हे यश महाविद्यालयाच्या नवोन्मेषी व संशोधनात्मक वाटचालीचे प्रतीक असल्याचे नमूद केले.